Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 1, April 2023; Pages 17 – 22
Original Research Article

# राजर्षी शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक

जायेवार जे. एल.
इतिहास विभाग, संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जिल्हा लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत
*E-mail:* jayewarjagdish.jj@gmail.com

Received: 23 February, 2023 | Accepted: 21 March, 2023 | Published: 23 March, 2023

**सारांश**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या अनेक विभूतींनी प्राणपणाने लढा दिला त्यात भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांचे नाव अग्रेसर आहे. ज्यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटीशांशी शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला. राजकिय स्वातंत्र्य मिळेपर्यंत गप्प असू नका असे ते ठणकावून सांगत. त्याच काळात महाराष्ट्रात समाजाच्या सामाजिक स्वातंत्र्यासाठी समाजातल्याच एका गटाविरूध्द जनतेला पेटवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराज करत होते. खरे तर दोघांचेही कार्य हे देशाच्या व समाजाच्या हिताचेच होते. शाहू व टिळक हे दाघेही देश समाजासाठी सर्वस्व अर्पण करून कार्य करताना काही दिवस सौहार्दाचे व सहकार्याचे संबंध असताना वेदोक्त प्रकरणाने हे संबंध टोकाला जाऊन एकमेकांचे वैचारिक शत्रु बनले. ठिळकांच्या विषयी शाहू महाराजांच्या मनात मात्र जरी राग असला तरी ते स्वातंत्र्याचे प्रणेते म्हणून त्यांच्यावर जरी नाखुष असले आणि त्यांच्यावर व्याख्यान व केसरीच्या माध्यमातून कडाडून टिका केली तरी यापुढे मी जीवंत असेपर्यंत केसरीत टीका येणार नाही. असे वचन देणारे व मरेपर्यंत पाळणारे ही टिळकच होते. टिळक आजारी पडल्यावर पन्हाळयावर खास व्यवस्था करण्याची तयारी करणारे व त्यापूर्वीच स्वातंत्र्यसुर्य मावळला असल्याची बातमी येताच रडता-रडता माझे त्यांचे वाकडे असूनही त्यांची देशसेवा थोर होती म्हणणारे आणि शिकारीचा बेत रद्द करून जेवण न करणारे राजर्षी शाहू महाराजच होते. दोघेही दोन टोक होऊन टोकाची विचारधारा मांडूनही एकमेकांसाठी वचन देणारे आणि अश्रु घाळणारे असे राज्यकर्ते राजर्षी शाहू महाराजच होते. विचारांच्या ठिकाणी विचार, मतभेदांच्या ठिकाणी मतभेद. पण वचन न मोडणारे आणि विरोधकांच्या आरोग्याच्या हितासाठी धडपडणारे व मृत्यूअंती अश्रु ढाळणारे व्यक्तीमत्व हे शाहू महाराज आणि टिळकच असू शकतात.

**महत्वाचे शब्द:** छत्रपती राजर्षी शाहू महाराज, लोकमान्य टिळक, लोकशाही,स्वराज्य, बहुजन, सामाजिक क्रांती, वेदोक्त प्रकरण, ब्रिटीश,स्वातंत्र्याचे प्रणेते, केसरी, सनातनी ब्राम्हण, नामदार गोपाळकृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे, समाज सुधारक गो. ग. आगरकर, कृष्णाजी भिकाजी गोखल, हरिपंत गोखले, सरन्यायाधिश, के.एन. पंडीत, व्ही.बी.गोखले, डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, चिरोट खटला, वॉर्नर, रॉबर्टसन, पन्हाळा, गायकवाड वाडा, सिंहगर्जना, रँड व जॅक्सन, महर्षी शिंदे, संकेश्वर (बेळगाव), दत्तोपंत बेळवी, विजापूरकर, शककर्ते, शिवाजी महाराज, रायगडी,

राज्यभिषेक, क्षत्रिय कुलावंस गागाभट्ट, मुंबई, लिटल ॲन्ड कंपनी, बडोदा, संस्थान, खालसा, दहशतवादी, दाजू जोशी, प्रबोधनकार ठाकरे.

**प्रस्तावना**

भारताच्या राजकिय व सामाजिक इतिहासाला ज्या थोरपुरूषांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने नवी दिशा दिली.त्या महान नेत्यांमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे नाव फार महत्वाचे आहे. लोकशाही,स्वराज्य तर हवेच पण त्या आधी ते उपभोगण्यासाठी व राबवण्यासाठी प्रथम जनतेत पात्रता आली पाहीजे व त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहीजे. या उद्देशाने प्रेरित होऊन शाहू महाराजांनी सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष देण्याचे ठरविले. शाहु महाराज हे विवेकी व धोरणी होते. इंग्रजांशी विरोध करून संस्थानाला धोका निर्माण करून घेण्यापेक्षा त्यांना सहकार्य करून संस्थानातल्या बहुजन समाजाला आपल्या सत्तेचा लाभ करून देऊन त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटणे हा मार्ग त्यांनी स्विकारला होता. त्यांचा हा मार्ग बहुजन समाजाच्या भवितव्याला कलाटणी देणारा व प्रबोधनाची नवी पहाट दाखवणारा ठरला.

निर्बलांना रक्षण देणे हीच बलाची खरी सफलता मानीत राजर्षी शाहू महाराज निरंतर काम करीत राहीले. जी कामे ताकदीने केली जात नाहीत ती कामे सहनशक्तीने, मुत्सद्देगिरीने वाद न घालता करीत राहीले. म्हणूनच ते सामाजिक क्रांती करू शकले. क्रांतीने पेटलेल्या मनाने पुढे कार्यात गती घेतली. गती ही अपरिहार्य आहे. प्रगती न झाली तर तुच्छ प्रगती सुरू होते. म्हणून प्रगतीसाठी अचूक माणसे शोधून त्यांचे सहकार्य घेऊन उल्लेखनिय असे कार्य केले.

एक आदर्श राजा, एक आदर्श लढवय्या कसा असावा हे त्यांच्या वेदोक्त प्रकरण, त्यांचे शैक्षणिक कार्य, अस्पृश्य समाजाच्या उध्दाराचे कार्य व त्यांच्या समाजोपयोगी कार्यातून दिसून येते. शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानातील दीन-दलीतांची दारुण अवस्था पाहून,या परिस्थितीला वेसन तर घातलीच, त्याशिवाय त्यांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रगतीचा मार्ग मोकळा केला. पण हे करत असताना धर्म मार्तंडानी राजर्षीच्या विषयी जे वाईट पेरलं ते कधी कधी अद्यापही डोकं वर काढत पण त्या परिस्थितीतही त्यांची सहनशक्ती व मुत्सद्येगिरी त्यांना क्रांती घडवण्यास प्रेरणा दिली. त्यातलेच एक प्रकरण म्हणजे वेदोक्त प्रकरण. त्यातून निर्माण झालेला वाद व शाहू- लोकमान्य टिळक संबंधातील बिघाड या विषयावर चर्चा होणे महत्वाचे समजूनच मी संबंधीत विषय हाताशी घेतलेला आहे.

**उद्देश**

१. वेदोक्त प्रकरणापूर्वीच्या संबंधाचा आढावा घेणे.
२. वेदोक्त प्रकरणाने (शाहू-टिळक) वाद कसे निर्माण झाले याचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठी व्दितीयक साधन सामुग्रीचा आधार घेण्यात आला.

**विषय विवेचन**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या अनेक विभूतींनी प्राणपणाने लढा दिला त्यात भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांचे नाव अग्रेसर आहे. ज्यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटीशांशी शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला. राजकिय स्वातंत्र्य मिळेपर्यंत गप्प असू नका असे ते ठणकावून सांगत. त्याच काळात महाराष्ट्रात समाजाच्या सामाजिक स्वातंत्र्यासाठी समाजातल्याच एका गटाविरूध्द जनतेला पेटवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराज करत होते. खरे तर दोघांचेही कार्य हे देशाच्या व समाजाच्या हिताचेच होते. शाहू व टिळक हे दाघेही देश समाजासाठी सर्वस्व अर्पण

करून कार्य करताना काही दिवस सौहार्दाचे व सहकार्याचे संबंध असताना वेदोक्त प्रकरणाने हे संबंध टोकाला जाऊन एकमेकांचे वैचारिक शत्रु बनले.

### शाहू-टिळक यांचे सौहार्दाचे संबंध

शाहू महाराजांनी सनातनी ब्राम्हणांच्या विरूध्द लढयाचे रणशिंगे जरी फुंकले असले तरी सर्व सामान्य ब्राम्हणांशी त्यांचे जिव्हाळयाचे, सलोख्याचे, घनीष्ट नाते होते. सरकारी व खासगी सेवेत कीतीतरी ब्राम्हण मंडळी होती. हुज-यापासून ते उच्च अधिका-यांपर्यंत अशा ब्राम्हण मंडळीनी महाराजांशी इमान राखून सेवा बजावली. महाराजांनी देखील तिकिंच प्रेम देऊन त्यांच्यावर अनंत उपकार केले. गंगाधरराव झुरळे, कमलाकर सांगावकर हे हुजरे होते ज्यांच्यावर महाराजांचे प्रेम होते.नामदार गोपाळकृष्ण गोखले, न्यायमूर्ती रानडे व समाज सुधारक आगरकर यांच्या कडूनच शिक्षणप्रसाराचे कार्य शिकलो असे महाराज नेहमी म्हणत. गो.ग. आगरकर यांचे सुधारक पत्रक आर्थिक अडचणीत असताना महाराजांनीच आर्थिक मदत करून ते वृत्तपत्र वाचवले. कृष्णाजी भिकाजी गोखले व हरिपंत गोखले हे महाराजांचे सरन्यायाधिश होते. वेदोक्त पध्दतीचे संशोधन करण्याचे कार्य ही के.एन. पंडीत व व्ही.बी.गोखले यांच्यावरच सोपवले होते. जे महाराजांना क्षत्रीय असून वेदोक्ताचा अधिकार महाराजांना असल्याचा स्पष्ट निर्वाळा दिला असे कितीतरी नावे घेता येतात ज्यावरून महाराजांची ब्राम्हणांशी असलेले सौहार्दाचे संबंध स्पष्ट करतात.

एवढेच नव्हेतर लोकमान्यांनीही महाराजांच्या दत्तक विधाना प्रसंगीही चांगले विचार मांडले होते. त्यानंतर एकमेकांचे सहकार्य व त्यातून निर्माण झालेले संबंध , सहकार्याचे होते. डेक्कन एज्यूकेशन सोसायटीलाही महाराजांनी भरीव मदत केली होती. डेक्कन एजूकेशन सोसायटीनेही महाराजांना अध्यक्षपद बहाल केले होते. १९०३ ते १९०८ पर्यंत भावी सशस्त्र स्वातंत्र्य युध्दासाठी टिळकांनी एक गुप्त संघटना स्थापून ती मोठया चातुर्याने चालवली होती. या संघटनेला आर्थिक मदत म्हणून महाराज प्रत्येक वर्षाला ५०० रू पाठवीत असत. नेपाळमध्ये टिळकांच्या प्रेरणेनेच बंदुकीचा एक कारखाना काढण्याचा प्रयत्न सुरू होता. त्याला शाहू महाराजांनी ५००० रू ची भरीव मदतही केली होती. शिवाजी क्लब टिळकांच्या प्रेरणेने चालू होता. त्याला १९०१ पर्यंत महाराजांचा उघड पाठींबा होता. म्हणजेच वादग्रस्त वेदोक्त प्रकरणापर्यंत लोकमान्य टिळक व राजर्षीशाहू यांचे संबंध चांगले होतेच. पण त्यानंतरही टिळकांच्या बाबतीत असलेले महाराजांचे विचार हे अनुकुल होते. कारण लोकमान्य टिळक यांची भारतीय स्वातंत्र्यावरील श्रध्दा पाहून शाहू महाराजांचे टिळकावर अतोनात प्रेम होते. चिरोट खटल्यातही टिळकांच्या वकीलांच्या हाती ली वॉर्नर आणि रॉबर्टसन यांनी महाराजांना लिहिलेली पत्रे महाराजांनी गुप्तपणे पाठवून टिळकांच्या सुटकेसाठी प्रयत्न केला होता. असे प्रबोधनकार ठाकरे यांनी आत्मचरित्रात नमुद केले आहे. महाराज प्रबोधनकार ठाकरे यांना म्हणतात, ‘‘देशासाठी तो मरतोय नि आम्ही काय वेदोंक्ताचा वैरभाव राजकारणात सुध्दा गाजवावा? वाद जितक्यास तितका असावा’’ यावरून महाराजांचे टिळकांप्रतीचे मत लक्षात येते.

१९२० साली टिळक आजारी पडल्यानंतर त्यांची पन्हाळयावर खास व्यवस्था करण्याची महाराजांची तयारी होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्न देखील केला होता. पण त्यापूर्वीच मृत्युने टिळकांना जवळ केले. याचेही दुःख महाराजांनाच सर्वांत जास्त झाले. रायबागला शिकारीवर असताना जेंव्हा त्यांना ही वार्ता कळाली तेंव्हा आपले डोळे घट्ट मिटवून घेतले तरी अश्रुधारा मात्र सतत वाहत होत्या. पहाडाला घाम फोडणारे महाराज रडता-रडता म्हणाले, ‘‘ माझे त्यांचे वाकडे असलेतरी त्यांची देशसेवा थोर होती’’ त्या दिवशी शिकारीचा बेत रद्दकरून त्यांनी जेवले सुध्दा नाहीत आणि टिळकांच्या देशसेवेची अखंड स्तुती करीत राहीले.

शाहू महाराजांना ‘केसरीतील जहरी टिका अधिक बोचत असताना देखील पुणे येथे मुंबईच्या गव्हर्नर साहेबांनी संस्थानिकांच्या भरविलेल्या दरबार याचा लाभ उठवत महाराजांनी गायकवाड वाडा गाठून टिळकांना भेटायला गेले व तेथून

निघताना विसरलेला फेटा (जाणून-बुजून) हातात घेताना महाराजांनी हक्काने म्हणाले,''लोकमान्य, हा फेटा माझ्या डोक्यावर रहावा असे तुम्हाला वाटते का? रहावे असे वाटत असेल तर मग, माझ्यावर होणारी केसरीतील टीका थांबवा.'' टिळकांनीही, ''मी जो पर्यंत जिवंत आहे.तो पर्यंत केसरीत टिका येणार नाही.'' टिळकांनीही दिलेल्या वचनाचे अखेरपर्यंत पालन केले. सनातन्यांनी टिळकांची भेट घेऊन पुनश्च टिका करण्याची विनंती करूनही टीळक अखेर पर्यंत वचनाशी प्रमाणिक राहीले. हे नाते व संबंध होते टिळक व शाहूंचे. देशाच्या स्वातंञ्यासाठी लढणारा योध्दा टिळक व समाजात समतेची प्रस्थापना करण्यासाठी झटलेला समतेचा पुरस्कर्ता शाहू. जरी दोघे दोन टोकाचे असले तरी त्यांच्यात आत्मीयताच होती हे सिध्द करते.

**शाहू महाराज आणि लोकमान्य टिळकांचे वाद**

राजर्षी शाहू महाराज आणि टिळक दोघेही आपापल्या परीने देशसेवा व समाजसेवा करित असल् तरी त्यांच्यातले मतभेद टोकाचे  होते. सुरूवातीच्या काळात शाहू महाराजांच्या साहयाने अनेक स्वातंञ्याचे व देशसेवेचे कामे करणारे टिळक माञ वेदोक्त प्रकरणानंतर शाहूच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्यावर केसरी च्या माध्यमातून कडाडून टिका करत होते. हि टिका टोकाची होती.

२० एप्रील १९२० च्या केसरी मध्ये जातिभेद मोडून आर्थिक व सामाजिक कल्याण करण्याच्या कार्याला अपशकूनी कार्य म्हणून तसेच पुर्वीचे आचरण हया ध्येयाच्या किती विरूध्द आहे हे आखाडयात उतरलेल्या पहिलवानाला अनुभवाने कळल्यावाचून राहणार नाही आणि हे स्वतःची जूनी पातके धुऊन टाकण्याचा तपश्चर्येचा मार्ग असून यानं तरी बेरच कल्याण होईल अशी टिकेची सिंहगर्जना करून  आपल्याच बांधवांना मानवी स्वातंञ्य देण्यास नकार देत होते. पण शाहू महाराज न खचता आपले सभा व कार्य चालूच ठेवले हेते, तेंव्हा टिळक चिडुन मंथनासाठी सिंहगडावर निघून गेले. महाराजांनी मुद्दामच वासुदेव दत्तोपंत तोफखाने यांना टिळकांना भेटण्यासाठी पाठवले असता टिळकांनी शाहू महाराज त्यांचे कार्य थांबवावे अन्यथा त्यांची ही गत रँड व जॅक्सन सारखी होइल अशी मत्युची धमकीच दिली होती, त्यावेळी ही मी मरावे ही नियतीची इच्छा असेल तर मी जरुर मरेन पण स्विकारलेले कार्य कदापीही सोडणार नाही. असे म्हणूण आगीत तेलच ओतले आणी वाद वाढतच गेला.

लोकमान्य टिळकही महर्षी शिंदेच्या नेतृत्वाखलील अस्पृश्यता परिषदेत जो देव अस्पृश्यता पाळतो तो मी देव माणनार नाही असे म्हणूनही मी खासगी आयूष्यात अस्पृश्यता पाळणार नाही अशा प्रकारच्या करार पञावर माञ सही देण्यास नकार दिले.

१६ व १७ मे १९२० च्या संकेश्वर (बेळगाव) येथील परिषदेत दत्तोपंत बेळवी अध्यक्ष म्हणून बोलताना महाराजांचे चरिञ हनन करताना No Man's wife & life are safe in Kolhapur म्हणजेच कोल्हापूरात कोणाचीही बायको व जीवित सुरक्षित नाही. असे बिनबुडाचे आरोप केल्यानंतरही टिळकांनी माञ ताकीद न देता त्यावर पांघरून घालण्याचेच प्रयत्न केले आणि बायको ऐवजी अब्रु हे शब्द घालून वृत्तान्त छापला म्हणजे टिळकांची जणू बेळवींना संमतीच होती आणि महाराजांना विरोध होता. असाच अर्थ निघतो.

ऑगस्ट १९०० च्या ग्रंथमालेच्या अंकात विजापूरकरांनी शककर्ते शिवाजी महाराजांस ज्यांनी रायगडी राज्यभिषेक केला व क्षञिय कुलावंस म्हटले त्याचे निधन शौचकुपात पतन पावुन झाले असे गागाभट्टा विषयी अनुदगार काढले.आणि इकडे लोकमान्य टिळकांनी महार जात एक गुन्हेगार जात असल्याचे एका सभेत वक्तव्य केले. तेंव्हा शाहू महाराजांचा माञ संयम सुटला आणि त्यांनी २३ जून १९२० ला डॉ. आंबेडकरांना पञ लिहून यावर कोणती कारवाई करता येईल का? याचे चर्चा मुंबईतील प्रसिध्द लिटल ॲन्ड कंपनीशी करण्यास सांगीतले. वाद वाढतच होता दोन्ही टोकाकडून समस्या ताणलेच जात होते. पण शाहू महाराजांनी माञ टिळकांची भारतीय स्वातंञ्या वरिल श्रध्दा पाहून शांत बसले.

२२ व२९ ऑक्टोबर १९०१ रोजी पुन्हा केसरी मध्ये लेख लिहून महाराजांवर जोरदार टिकास्त्र सोडताना श्री गायकवाड सरकार बंडोद्यात व त्यांचा संसर्ग लागून कोल्हापूरातही मराठे मंडळीच्या मनात वेदोक्ताचा खूळ शिरली आहे ते इतरत्रही पोहचू शकतो. असे वेदोक्ताच्या वादाला खूळ म्हणून वेदोक्ताच्या मागणीला बंड असे म्हणून गायकवाड सरकार व शाहू महाराज यांना दोष दिले म्हणजेच टिळक हे सनातनी ब्राम्हणांची बाजू घेऊन पुन्हा एकदा शाहू महाराजाना धक्का दिला. ज्या टिळकांना महाराजांनी स्वातंत्र्यकार्यात सहकार्य केले होते हे मागे पाहीलेच आहे. एवढेच नाही तर वेदोक्त प्रकरणाचा फज्जा उडताच चिडून केसरीने अन्यायी व बेशरमी कृत्य हा लेख लिहून महाराजांवर आगपाखंड करून महाराजांना शाप देत जून १९०५ च्या केसरी मध्ये, जेंव्हा हे संस्थान खालसा होईल तेव्हाच जनतेचे समाधान होईल असे लिहीले.

मार्च १९०७ मध्ये टिळक ताईमहाराज पंडीतांच्या सावत्र मुलीचा विवाह विशालगडावर पंतांच्या चिरंजीवांशी जमतो की, नाही हे पाहण्यासाठी कोल्हापुरात आले खरे तेथे त्यांनी लक्ष्मी थिएटरमध्ये व्याख्यानात लोकांच्या समाधानासाठी व टाळया मिळवण्यासाठी वेदोक्ताचा अधिकार महाराजांना आहे म्हणून टाळया मिळवल्या ख-या पण टिळक ज्यावेळी महाराजांना भेटावयास आले तेंव्हा त्यांनी खुलासा केला की महाराजाना वेदोक्ताचा अधिकार आहे. जरूर आहे. पण तो ते महाराज आहेत म्हणून, छत्रपती आहेत म्हणून एक मराठा म्हणून नव्हे म्हणजे त्याचा अर्थ असा की, महाराज असल्यामूळे ते क्षत्रिय पण त्यांचे बंधू मात्र शुद्र. महाराजांना टिळकांच्या विधानामूळे धक्काच बसला आणि त्यांनी आपले कार्यआणखी जोमाने चालूच ठेवली पण एवढे मात्र खरे की, जर वेदोक्त प्रकरण झाले नसते तर शाहू महाराजांचाही दृष्टीकोन परंपरागतच राहीला असता आणि टिळकांचीही भूमिका त्यांना समजली नसती.

सनातन्यांनी वरिल प्रमाणे नुसते टिका टिप्पणी करूनच थांबले नाही तर त्यांनी टोकाचे पाऊल म्हणून ब्रिटीश दरबारी संस्थान खालसा करण्याचे प्रयत्नही चालवत होते पण शाहूजींच्या मत्सद्देगिरीमुळे व ब्रिटीशांशी असलेल्या त्यांच्या संबंधामूळे त्यांचे प्रयत्न फोल झाले. त्यांच्या प्रयत्नांना यश येत नाही म्हणून सनातन्यांनी दहशतवादी दाजू जोशीला हाताशी धरून शाहूंच्या मूलीच्या लग्नात बॉम्ब टाकून शाहूंना ठार मारण्याच्या कटही रचला होता.

एकंदरीत सनातन्यांचे शाहू महाराजांना विरोध व त्याना टिळकांचे सहाय्य या सर्व गोष्टी मूळे टिळक- शाहू वाद मात्र टोकाला गेले होते. मात्र ठिळकांच्या विषयी शाहू महाराजांच्या मनात मात्र जरी राग असला तरी ते स्वातंत्र्याचे प्रणेते म्हणून त्यांच्यावर जरी नाखुष असले आणि त्यांच्यावर व्याख्यान व केसरीच्या माध्यमातून कडाडून टिका केली तरी यापुढे मी जीवंत असेपर्यंत केसरीत टीका येणार नाही. असे वचन देणारे व मरेपर्यंत पाळणारे ही टिळकच होते. टिळक आजारी पडल्यावर पन्हाळयावर खास व्यवस्था करण्याची तयारी करणारे व त्यापूर्वीच स्वातंत्र्यसुर्य मावळला असल्याची बातमी येताच रडता-रडता माझे त्यांचे वाकडे असूनही त्यांची देशसेवा थोर होती म्हणणारे आणि शिकारीचा बेत रद्द करून जेवण न करणारे राजर्षी शाहू महाराजच होते. दोघेही दोन टोक होऊन टोकाची विचारधारा मांडूनही एकमेकांसाठी वचन देणारे आणि अश्रु घाळणारे असे राज्यकर्ते आजच्या काळाला मिळतील का? विचारांच्या ठिकाणी विचार, मतभेदांच्या ठिकाणी मतभेद. पण वचन न मोडणारे आणि विरोधकांच्या आरोग्याच्या हितासाठी धडपडणारे व मृत्यूअंती अश्रु ढाळणार व्यक्तीमत्व हे शाहू महाराज आणि टिळकच असू शकतात. त्यांची जागाच कोणी घेऊ शकत नाही. अशाच थोर व्यक्तीमत्वांची आज देशाला नितांत गरज आहे. आज सत्तेसाठी एकमेकांवर चिखल फेक करून स्वार्थासाठी एकमेकांच जीव घेणारे राज्यकर्ते बनले आहेत. त्यात सामान्यांचे काय हाल? आणि देशाची तर सांगता सोय नाही. पण एकंदरीत दोघेही देश व समाजासाठी लढणारे वेगवेगळे विचारधारा होते हे मान्य करावेच लागेल.

**निष्कर्ष**

**१.** हुज-यापासून ते उच्च अधिका-यांपर्यंत अशा ब्राम्हण मंडळीनी महाराजांशी इमान राखून सेवा बजावली.

२. शाहू महाराजांनी सनातनी ब्राम्हणांच्या विरूध्द लढयाचे रणशिंगे जरी फुंकले असले तरी सर्व सामान्य ब्राम्हणांशी त्यांचे जिव्हाळयाचे, सलोख्याचे, घनीष्ट नाते होते.एकमेकांचे सहकार्य व त्यातून निर्माण झालेले संबंध , सहकार्याचे होते.

३. महाराजांना क्षत्रीय असून वेदोक्ताचा अधिकार असल्याचा स्पष्ट निर्वाळा दिला असे कितीतरी नावे घेता येतात ज्यावरून महाराजांची ब्राम्हणांशी असलेले सौहार्दाचे संबंध स्पष्ट करतात.

४. वेदोक्त प्रकरण झाले नसते तर शाहू महाराजांचाही दृष्टीकोन परंपरागतच राहीला असता आणि टिळकांचीही भूमिका त्यांना समजली नसती.

५. लोकमान्य टिळक यांची भारतीय स्वातंत्र्यावरील श्रध्दा पाहून शाहू महाराजांचे टिळकावर अतोनात प्रेम होते.

**६.** विचारांच्या ठिकाणी विचार, मतभेदांच्या ठिकाणी मतभेद. पण वचन न मोडणारे आणि विरोधकांच्या आरोग्याच्या हितासाठी धडपडणारे व मृत्यूअंती अश्रु ढाळणारे  व्यक्तीमत्व हे शाहू महाराज आणि टिळकच असू शकतात.अशाच थोर  व्यक्तीमत्वांची आज देशाला नितांत गरज आहे

७. दोघेही देश व समाजासाठी लढणारे वेगवेगळे विचारधारा होते हे मान्य करावेच लागेल.

८. दोघेही दोन टोक होऊन टोकाची विचारधारा मांडूनही एकमेकांसाठी वचन देणारे आणि अश्रु घाळणारे असे राज्यकर्ते होते.

**संदर्भ सूची**


१. शाहूंच्या आठवणी, प्रा.नानासाहेब साळुंखे.

२. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, य.दि. फडके.

३. माझी जीवनगाथ, प्रबोधनकार ठाकरे.

४. राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव, डॉ.रमेश जाधव.

५. छत्रपती राजर्षी शाहू महाराज, तु.बा. नाईक.